**CNR-MHAK-01-002462-2019**

विशेष लाचलुचपत ख.क्र.८५/२०१९
सरकार -वि- सईद अहमद

**निशानी १३ खालील आदेश**

(दिनांक ३१.०१.२०२३ रोजी पारीत)

सदर खटल्यातील आरोपी सईद अहमद शेख मुसा याने सदरचा अर्ज फौजदारी प्रकीया संहीतेच्या कलम २२७ नुसार दोषमुक्तीसाठी दाखल केला असून निशाणी १५ वर सहा. सरकारी वकीलांनी म्हणणे दिले आहे. सदर अर्ज व म्हणणे वाचले. सहा. सरकारी वकील व तपासीक अंमलदाराने दिलेले म्हणणे वाचले आरोपीतर्फे वकीलांनी निशाणी १८ वर दिलेला लेखी युक्तीवाद वाचला. सहा. सरकारी वकील श्री. गोदे यांचा युक्तीवाद ऐकला. खटल्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. सदर अर्जास सहा. सरकारी वकील व तपासीक अंमलदाराने हरकत घेतांना याच मजकुराचा अर्ज यापुर्वी आरोपीने निशाणी ३ वर दाखल केला होता व तो अर्ज दिनांक ११.११.२०२१ रोजी गुणागुणांवर फेटाळण्यात आला असून त्यानंतर प्राप्त परिस्थितीत कोणताही बदल झाला नसल्याने तसेच दिनांक ११.११.२०२१ रोजी जी कागदपत्रे अस्तित्वात होती त्या शिवाय आरोपीस सहाय्यभुत ठरतील अशी कोणतीही कागदपत्रे आली नसल्याने सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा असे म्हटले आहे.

३. वरील परिस्थितीत प्रस्तुत अर्ज व यापुर्वी निशाणी ३ वर दिलेला अर्ज तसेच निशाणी ३ वरील अर्ज निकाली करण्यात आला त्यावेळची परिस्थितीत व प्रस्तुत अर्ज दाखल करतांनाची परिस्थिती विचारात घ्यावी लागेल. निशाणी ३ वरील अर्ज न्यायालयात आरोपीविरूध्द लाचलुचपत प्रतिबंध अधिनियमाच्या कलम ७ व ७ (अ) नुसार गुन्ह्यांकरीता आरोप पत्र दाखल करण्यात आल्यानंतर दाखल करतांना आरोपीस महानगर पालीकेमध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर दिनांक ११.०४.२०१८ ते १०.१०.२०१८ या कालावधीकरीता शेवटची नियुक्ती देण्यात आली होती व आरोप पत्रामध्ये नमुद तथाकथीत

घटना ही दिनांक ११.१२.२०१८ रोजीची असल्याची बाब सकृतदर्शनी विचारात घेता आरोपी हा महानगर पालीकेमध्ये कनिष्ठ अभियंता पदावर कार्यरत नसल्याने तो त्या दिवशी लोकसेवक नव्हता त्यामूळे सदर गुन्ह्यांबाबत आरोपी/अर्जदाराविरूध्द आरोप पत्र दाखल करण्याचा लाचलुचपत प्रतिबंध विभागास कोणताही अधिकार नसल्याने आरोपीस सदर गुन्ह्यातुन दोषमुक्त करण्यात यावे अशी विनंती करण्यात आली होती.

४. निशाणी ३ वरील अर्जाखाली सहा. सरकारी वकीलांनी म्हणणे देतांना आरोपी हा नमुद दिवशी ज्या ठिकाणी कार्यरत होता तेथील सक्षम अधिकाऱ्याने आरोपी विरूध्द आरोप पत्र दाखल करण्यास मंजुरी दिली असून सकृतदर्शनी आरोपीने लोकसेवक या पदावर कार्यरत असतांना सदर गुन्हा केला असल्याने सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा असे म्हटले होते.

५. निशाणी १३ वरील अर्जामध्ये देखील फिर्यादी पक्षाचे कथन थोडक्यात नमुद करतांना अर्जाच्या परिच्छेद ६ मध्ये 'आरोपीची शेवटची नियुक्ती ही दिनांक ११.०४.२०१८ ते १०.१०.२०१८ या कालावधीसाठी होती' परिच्छेद ७ मध्ये 'दिनांक १०.१०.२०१८ नंतर आरोपीला म.न.पा. ने परत मानधन तत्वावर नियुक्त केले नाही' परिच्छेद ८ मध्ये लाचलुचपत प्रतिबंध विभागाने फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द दिनांक १२.१२.२०१८ रोजी सापळा रचुन त्याला अटक केली जेव्हा की आरोपी म.न.पा. मध्ये दिनांक १०. १०.२०१८ पर्यंत मानधन तत्वावर काम करीत होता व त्यानंतर त्याला पुढील कालावधीसाठी नियुक्ती देण्यात आली नव्हती म्हणजेच दिनांक १२.१२.२०१८ रोजी आरोपी हा म.न.पा.च्या शासकीय सेवेत नव्हता व त्यामूळे तो लोकसेवकच्या परिभाषेत बसत नाही' असा मजकुर नमुद करण्यात आला आहे. निशाणी १३ वरील अर्जातील मजकुर विचारात घेता निशाणी ३ वरील अर्जामध्ये दोषमुक्तीकरीता आरोपीने जे मुद्दे उपस्थित केले आहेत तेच मुद्दे निशाणी १३ वरील अर्जामध्ये उपस्थित केल्याचे दिसुन येते.

६. वरील परिस्थितीत निशाणी ३ वरील अर्ज दिनांक ११.११.२०२१ रोजी फेटाळतांना माझ्या पुर्वाधिकाऱ्यांनी सदर आदेशाच्या परिच्छेद १३ मध्ये

'13] The applicant claims that on the day of incident he was not in service with Municipal Corporation. He was not public servant on the day of incident. Therefore, the charge cannot be framed against him. The prosecution has annexed sanction order issued by Commissioner, Municipal Corporation, Akola. On perusal of said sanction order, it appears that applicant was appointed on contractual basis on the post of Junior Engineer from 11.12.2015 to 12.12.2018. The sanctioning authority had accorded sanction to lodge prosecution against applicant. The contents of sanction order shows that on 12.12.2018 the applicant was in service with the Corporation as Junior Engineer. The applicant has filed order dated 21.02.2019 issued by Corporation, in which the names of the employees employed on contractual basis from 12.10.2018 to 11.04.2019, are mentioned. The names of applicant is not mentioned in said list. The said order is having retrospective effect. The order is issued on 21.02.2019 and is issued for the period from 10.12.2018 to 11.04.2019. Apart from the said 6 order the applicant has not annexed any other document to show that on the day of incident he was not working with Municipal Corporation, Akola. The sanction order which is on record shows that on the day of incident, the applicant was working as Junior Engineer with Municipal Corporation, Akola. The said fact clearly shows that on the day of incident, the applicant was public servant and was performing public duty. Therefore, prosecution should be given chance to prove that on 11.12.2018 i.e. on the day of incident applicant was in service on contractual basis with the Corporation. The sanction order prima facie show that on the day of incident the applicant was in service on contractual basis as Junior Engineer with Municipal Corporation, Akola. The material further shows that the applicant had demanded and accepted the bribe amount.'

असे निरीक्षण नोंदविले होते. दिनांक ११.११.२०२१ रोजी निशाणी ३ वरील अर्ज फेटाळण्यात आल्यानंतर त्या आदेशाविरूध्द वरिष्ठ न्यायालयात दाद मागीतल्याचे आरोपीचे कथन नाही. या परिस्थितीत दिनांक ११.११.२०२१ रोजीचा आदेश अंतीम झाला आहे.

७. वरील बाब पाहता दिनांक ११.११.२०२१ चा आदेश पारीत झाल्यानंतर अर्जदार/आरोपीस काही कागदपत्रे प्राप्त झाली किंवा प्राप्त परिस्थितीत बदल झाल्यास आरोपीस दोषमुक्तीसाठीची विनंती नव्याने अर्ज दाखल करून करता येईल याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. परंतु निशाणी १३ वरील अर्जातील कथनापुष्ठ्यर्थ आरोपीने निशाणी १२ वरील यादीसोबत

दाखल केलेल्या ४ कागदपत्रांचा आधार घेतला असून त्यामध्ये १२/१ वर आरोपीने आयुक्त महानगर पालीका यांच्याकडे माहिती अधिकाराखाली माहिती मिळण्यासाठी दिलेल्या अर्जाची छायांकीत प्रत असून ती माहिती घेवून जाण्याबाबत आरोपीस देण्यात आलेल्या पत्राची प्रत निशाणी १२/२ वर दाखल करण्यात आली आहे. तसेच निशाणी १२/३ वर उपरोल्लेखीत १२/१ वरील अर्जामध्ये नमुद मुद्दयांवर आधारीत माहिती दिल्याचे जनमाहिती अधिकारी, महानगर पालीका, अकोला यांच्या पत्राची छायांकीत प्रत असून निशाणी १२/४ वर दिनांक ०७.०७.२०१८ रोजी सामान्य प्रशासन विभाग, अकोला महानगर पालीका, यांच्या दिनांक ११.०४.२०१८ पासुन मानधन तत्वावर करण्यात आलेल्या नियुक्त्याबाबत कर्मचाऱ्यांचे नांव व कालावधी यासंबंधीच्या यादीची छायांकीत प्रत असून त्या यादीच्या अनु.क्र. १३१ वर आरोपीचे नांव कनिष्ठ अभियंता या पदाकरीता रूपये २५,०००/- दरमहा मानधनावर दिनांक ११.०४.२०१८ ते १०.१०.२०१८ या कालावधीकरीता नेमणुक करण्यात आल्याबाबत नमुद आहे. तसेच करारातील अटी व शर्तीदेखील त्यामध्ये नमुद आहेत. परिणामतः निशाणी १२ सोबत दाखल करण्यात आलेली कागदपत्रे पाहता त्यामध्ये नमुद मुद्दे निशाणी ३ वरील अर्जामध्ये उपस्थित करण्यात आल्याचे दिसून येते. सबब, निशाणी १२ सोबत दाखल करण्यात आलेली कागदपत्रे नव्याने आरोपीस प्राप्त झाली असून निशाणी ३ वरील अर्जामध्ये नमुद केलेल्या मुद्दयांपेक्षा भिन्न मुद्दयांशी संबंधीत ती कागदपत्रे आहेत असे म्हणता येणार नाही. सबब, निशाणी ३ वरील अर्ज गुणागुणांवर फेटाळण्यात आल्याने व त्या आदेशास आरोपीने आव्हान दिले नसल्याने तो आदेश अंतीम झाल्याची बाब विचारात घेता सदरचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

८. याशिवाय फिर्यादी पक्षाच्या कथनानुसार जरी आरोपीची नेमणूक दिनांक ११.०४.२०१८ ते १०.१०.२०१८ या कालावधीकरीता मानधनावर कनिष्ठ अभियंता पदावर करण्यात आली होती व दिनांक १०.१२.२०१८ ते ११.०४.२०१९ या कालावधीकरीता मानधनावरील कनिष्ठ अभियंत्याबाबत काढण्यात

आलेल्या आदेशामध्ये महानगर पालीकेने आरोपीचा समावेश केला नसला तरी दिनांक १२.१२.२०१८ रोजी आरोपी हा लोकसेवकाचे कर्तव्य करीत असल्याचे भासवून त्याने तक्रारदाराकडून लाचेची मागणी करून सापळा कार्यवाहीदरम्यान लाचेची रक्कम स्विकारली आहे. या घडीला आरोपीचा बचाव कोणता आहे हे विचारात घेण्याची आवश्यकता नाही याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. याशिवाय ***एम.ई.शिवलिंगमुर्ती वि. सि.बि.आय. बंगळुरु क्रिमीनल अपिल क्रमांक ९५७/२०१७, निकाल दिनांक ०७.०१.२०२०*** या न्यायनिर्णयामध्ये नामदार सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की,**Para-26-**'*It is not open to the accused to rely on material by way of defence and persuade the Court to discharge him.* **Para-28-***In view of the decisions of this court that the accused can only rely on the material which are produced by the prosecution, it must be understood that grave suspicion, if it is established on the materials, should be explained away only in terms of the materials made available by the prosecution. No doubt, accused may appeal to the broad probabilities to the case to persuade the Court to discharge him*'. वरील न्यायनिर्णय पाहता निशानी १३ वरील अर्ज निकाली करतांना या प्रकरणी आरोपीचा बचाव काय राहील हे या घडीला विचारात घेण्याचे कारण नाही.

९. वरील परिस्थीतीत आरोपपत्राचे अवलोकन करता दिनांक २९.०५.२०१९ रोजी आयुक्त, अकोला महानगर पालीका, अकोला यांनी आरोपीविरूध्द वरील गुन्ह्यांबाबत आरोपपत्र दाखल करून खटला चालविण्याकरीता मंजुरी देतांना 'सईद अहमद शेख मुसा हे अकोला महानगर पालीकेच्या कनिष्ठ अभियंता या पदावर (मानधन तत्वावर) दिनांक ११.१२.२०१५ ते १२.१२.२०१८ या कालावधीत कार्यरत असल्याने ते लोकसेवक होते. आरोपी सईद अहमद शेख मुसा यांनी सदरच्या कालावधीत सदर परिशिष्टामधील रकाना क्रमांक ४ मध्ये विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे अभिकथीत कृत्य केले आहे' असे नमुद करतांना आरोपीविरूध्द खटला चालविण्याकरीता मंजुरी प्रदान करीत असल्याचे म्हटले आहे.

१०.  याशिवाय  दिनांक १२.१२.२०१८ रोजी आरोपी हा दाबकी रोडवरील पश्चिम झोनच्या कार्यालयात कार्यरत होता व तथाकथीत यशस्वी सापळा कार्यवाहीनंतर आरोपी हा त्या कार्यालयात सदर सापळ्यातील सहभागींना घेवून गेला व त्याच्या ताब्यात असलेल्या लोखंडी कपाटातून त्याने तक्रारदार याचे प्रभाग १८ मधील नाली बांधकामाचे एम.बी. बुक हजर केले असे देखील फिर्यादी पक्षाचे कथन असून ते एम.बी.बुक जप्त करण्यात आल्याचे फिर्यादी पक्षाचे कथन सकृतदर्शनी विचारात घेता जरी दिनांक १०.१०. २०१८ रोजी मानधन तत्वावरील आरोपीच्या सेवेचा कालावधी संपला असला तरी त्याच्या ताब्यात तक्रारदाराशी संबंधीत तसेच महानगर पालीकेशी संबंधीत कागदपत्रे होती हे सकृतदर्शनी दिसुन येते.

११.  तसेच जरी या घडीला दिनांक १०.१२.२०१८ ते ११.०४.२०१९ या मानधन तत्वावरील कर्मचाऱ्यांच्या यादीमध्ये आरोपीचा समावेश नसला तरी सहा.सरकारी वकीलांनी युक्तीवादादरम्यान महानगर पालीकेकडून मानधन तत्वावरील कर्मचाऱ्यांचा कालावधी संपल्यानंतर लगेचच पुढील कालावधीकरीता आदेश काढण्यात येत नव्हते व संबंधीत कार्यकाळ संपल्यानंतर ठराव घेवून नंतर आदेश काढला जातो असे सांगीतले असून निव्वळ ११.०४.२०१८ ते १०. १०.२०१८ इतक्याच कालावधीकरीता आरोपीस मानधन तत्वावर नेमण्यात आले नव्हते तर त्यापुर्वी देखील त्यास मानधन तत्वावर नेमण्यात आले होते हे फिर्यादी पक्षाचे कथन सकृतदर्शनी विचारात घेता मानधन तत्वावरील विहीत कालावधी संपल्यानंतर पुढे आदेश काढण्यात येईल असे गृहीत धरून आरोपीकडे संबंधी जबाबदारी कायम ठेवण्यात आली होती व त्यामूळे तो दिनांक १२.१२. २०१८ रोजी लोकसेवक या नात्याने काम करीत होता हा सहा.सरकारी वकीलांचा युक्तीवाद सकृतदर्शनी अस्विकारार्ह नाही.

१२.  वरील बाबी पाहता **अमीत कपुर –वि– रमेश चंदर आणि इतर (2012) 9SCC 460**, या न्यायनिर्णयामध्ये असे म्हटले आहे की, ‘At the time of

considering the application for discharge the court is required to consider the 'record of the case' and the documents submitted. Where it appears to the court that there is ground for presuming that the accused has committed an offence, it shall frame the charge. The court is not concerned with evidence, but only with strong suspicion that the accused had committed the offence'. याशिवाय **<u>असिम शरीफ –वि– नॅशनल इन्व्हेस्टीगेशन एजंसी (2019) 7 SCC 149</u>**, या न्यायनिर्णयामध्ये असे म्हटले आहे की, 'While considering the application for discharge, the court has power to sift and weigh the evidence only for limited purpose to find out whether or not prima facie case exists against the accused. If the material placed before the court raises from suspicion against the accused, the court is wholly justified in framing of the charge.'

१३. वरील न्यायनिर्णय विचारात घेता तसेच निशाणी १५ वरील म्हणण्यामध्ये सदर अर्जास हरकत घेतांना सदर गुन्ह्यातील आरोपीच्या सहभागाबाबत उपस्थित केलेले मुद्दे व त्या पुष्ठ्यर्थ आरोपपत्रासोबत पुरावा देण्यात आल्याचे फिर्यादी पक्षाचे कथन विचारात घेता वरील परिस्थीतीत आरोपीविरूध्द खटला पुढे चालविण्यापुरता सकृतदर्शनी पुरावा आहे किंवा कसे इतकेच या घडीला पाहणे आवश्यक असुन उपलब्ध पुराव्याआधारे आरोपीस संबंधीत अधिनियमातील संबंधीत गुन्हयांबाबत दोषी धरता येईल किंवा कसे हे पाहण्याचे कारण नाही हा सहा.सरकारी वकीलांचा युक्तीवाद स्विकारार्ह आहे. याशिवाय **<u>स्टेट ऑफ गोवा वि. गणेश हेगडे आणि इतर 2014 ALL MR (Cri) 2532</u>** या न्यायनिर्णयामध्ये असे म्हटले आहे की, 'Para-9- '*For framing the charge, the Court is expected to see as to whether the material is sufficient for proceeding against the accused and the court is not expected to ascertain as to whether the material will be sufficient to convey the accused. Further the material as it is, as un-rebutted, without considering the probabilities which may be in favour of accused needs to be considered by the Court'.*

१४. माझेसमोरील खटल्यातील उपरोल्लेखीत बाबी पाहता सदर न्यायनिर्णय फिर्यादी पक्षाच्या मदतीस येतो. सबब, लाचलुचपत प्रतिबंध अधिनियमाच्या ७ व ७ (अ) नुसार आरोपी विरुध्द आरोप निश्चित करण्याइतका पुरावा सकृतदर्शनी दिसून येत असल्याने आरोपी हा दोषमुक्त होण्यास पात्र असल्याचा आरोपीतर्फे वकीलांचा युक्तीवाद स्विकारार्ह नाही. वरील कारणास्तव निशाणी १३ वरील अर्ज नामंजुर होण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

निशानी १३ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by SUNIL MARUTIRAO PATIL
Date: 2023.02.01 11:24:26 +0530

दिनांक : ३१.०१.२०२३ (सुनिल मा. पाटील)
विशेष न्यायाधीश,
{लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम}, अकोला

...

***Certificate*.**

*The contents of this PDF file are same word for word as per original order.*

| | |
|---|---|
| *Name of the Steno :* | *A.R.Raipure, Stenographer Grade-1* |
| *Court's name :* | *District Judge III & Addl. Sessions Judge, Akola.* |
| *Date of decision :* | *31.01.2023* |
| *Signed by P O on :* | *01.02.2023* |
| *Uploaded on :* | *01.02.2023* |